ISSSN 2278-5914

# Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

(Inst.Reg No.Maharashtra/13482/Satara/2010)

Email ID: sisms2010@gmail.com

# SANSHODHAN

RESEARCH JOURNAL

ISSUE - X

October 2020

## Editorial Board

Prin.Dr. Vijayrao Nalawade

Prof. [illegible] Thorat

Dr. Vinayakrao Jadhav

Vishvnath Pawar

Dr. Ajitkumar Jadhav

Jaypal Sawant

Dr. Dattatray Korade

2020

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | डॉ. चंद्रकांत बापुराव कुंभार | महात्मा गांधीजींच्या विचारांचा कर्मवीरांच्यावर पडलेला प्रभाव | १२५ |
| २४ | प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते | महात्मा गांधीजींच्या वैचारिकतेतून महिला सबलीकरण — एक दृष्टीक्षेप | १२८ |
| २५ | प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम | महात्मा गांधीजीचे खादी विषयक विचार | १३५ |
| २६ | डॉ. शांत माधुरी राजाराम | भारतीय स्वातंत्र्य चळवळ बांधणीतील महान द्रष्टे–नामदार गोपाळ कृष्ण गोखले व महात्मा गांधी | १३९ |
| २७ | सौ. अनुराधा प्रशांत पवार (गोरे) | सत्याचा आग्रह धरणारा महात्मा | १४३ |
| २८ | प्रा. रूपाली सुनिल पाटील | महात्मा गांधी - भारतीय स्वातंत्र्य चळवळ | १४८ |
| २९ | प्रा. रामचंद्र धुळे | 'हिंद स्वराज्य' गांधी विचारांचा जाहिरनामाः एक अवलोकन | १५६ |
| ३० | श्री.मराळ आप्पा माणिक | महात्मा गांधीजींच्या विचारप्रणालीतील – स्त्री विषयक दृष्टिकोन व स्त्री – पुरूष समानता | १६३ |
| ३१ | डॉ. बोराडे गीतांजली भीमराव | 'गांधीवाद आणि स्त्री' (लिंगभाव व पितृसत्तेच्या संदर्भात) | १६८ |
| ३२ | दिगांबर राधाकिसन जाधव. | महात्मा गांधी यांचे ग्रामस्वच्छते विषयी विचार एक ऐतिहासिक चिकित्सा | १७५ |
| ३३ | डॉ. शाहीन एवाज जमादार | राष्ट्रपिता महात्मा गाँधी का भारतीय राष्ट्र भाषा–प्रेम | १७८ |
| ३४ | प्रा. डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे | महात्मा गांधी यांचे राजकीय विचार | १८१ |
| ३५ | मृण्मय दिपक अरबुणे | मिझार ॲबेझ : गांधीवादी नेता | १८५ |
| ३६ | डॉ. विवेकानंद माने | सातारा जिल्ह्यातील छोडो भारतचा क्रांतीलढा | १९० |
| ३७ | प्रा. डी. के. रसाळ<br>प्रा. डॉ. विष्णू वी. वाघमारे | सोलापूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील अनुयायांचे योगदान | १९६ |
| ३८ | प्रा. श्रीमती संयोगिता एम. ससाणे | रत्नागिरीचे ऐतिहासिक विशेष कारागृह– एक राष्ट्रीय स्मारक | १९९ |
| ३९ | प्रा. डॉ. सुनिल दिनकर पवार | लोकमित्र भि. दा. भिलारे (गुरूजी) यांचे महाबळेश्वर तालुक्यामधील समाजसुधारणा चळवळीतील योगदान | २०५ |
| ४० | प्रा.डॉ.शिवाजी वाघमोडे | पेशवेकालीन चलनव्यवहार | २०८ |
| ४१ | जमीर अकबर आवटे | टेंभुर्णी गावचा इतिहास | २१३ |
| ४२ | प्रणव विजयकुमार पाटील | वलगवडे गावातील पशुपालकांचे वीरगळ | २२ |

# २४. महात्मा गांधीजींच्या वैचारिकतेतून महिला सबलीकरण — एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. सौ. कल्पना राजीव मोहिते
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
इस्लामपूर, ता. वाळवा जि. सांगली

**प्रस्तावना—**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करून हिंदूस्थानला स्वातंत्र्य मिळवून देणारे भारताबरोबरच विश्वाला सत्य, अहिंसेचा संदेश देऊन मानवाच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी आधुनिक भारताच्या इतिहासातील अलौकीक व्यक्तिमत्व होय.त्यांचे जीवनचरित्र म्हणजे एक आदर्शवत तत्वज्ञान होय. भारतीय स्वांतत्र्य लढा, राजकारण, समाजकारण, शिक्षण, अस्पृश्यता निवारण, महिला सबलीकरण इ. अनेक बाबतीत त्यांनी केलेले कार्य अद्वितीय असेच आहे. पारतंत्र्यात दबल्या गेलेल्या भारतीयांच्यात आत्मविश्वास निर्माण करून त्यांना निर्भय बनविण्याचे कार्य महात्मा गांधीनी केले. पुरूषप्रधान भारतीय व्यवस्थेमध्ये सामाजिक बंधनात अडकलेल्या स्त्रीचा दर्जा व स्थान उंचावण्यासाठी तिला स्वातंत्र्य व समता प्रस्थापित करून देण्यासाठी, आपल्या विचारांना कृतीची जोड देऊन महात्मा गांधीनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण ठरते. प्रस्तुतच्या संशोधन लेखात महात्मा गांधींनी महिला सबलीकरणाबाबत केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान —**

तत्कालीन भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम होते. घराच्या चार भिंतीच्या आत चुल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तु म्हणुन तिच्याकडे पाहिले जाई. रूढी आणि परंपराच्या भोवऱ्यात अडकलेल्या स्त्रीला प्रचलीत समाज व्यवस्थेत माणूस म्हणून असलेले स्वातंत्र्य व समतेचे हक्क नाकारलेले होते. काही हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या स्त्रिया व्यतिरिक्त सर्वसामान्य स्त्री सामाजिक क्षेत्रापासून दूर होती. अशा परिस्थितीत महात्मा गांधीनी सर्वांगीण स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. शेकडो वर्षे प्रतिगामी व्यवस्थेत रूढी परंपरांच्या भोवऱ्यात अडकलेल्या स्त्रीला स्वातंत्र्य मिळवून देऊन पुरूषांच्या बरोबरीचे स्थान दिले.[१]

तत्कालीन परिस्थितीत स्त्रीयां संदर्भात प्रचलीत असणाऱ्या बालविवाह, हुंडापद्धती, विधवा विवाह बंदी, बुरखा पद्धती, घटस्फोट इ. विषयी पुरोगामी विचार मांडून त्यांनी स्त्रियांना समतेच्या प्रवाहात आणले. प्राचीन काळाचे दाखले देत गांधीजी म्हणतात, मनुस्मृतीने स्त्रीयांना स्वातंत्र्य व हक्क नाकारले पण वैदिक काळात मात्र स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य होते. त्यांना बरोबरीचा दर्जा होता. त्याप्रमाणे आजच्या काळातही स्त्रियांना समानतेचा आधिकार मिळावा या विचारांचा गांधीजींनी पुरस्कार केला. त्यांच्यामते राष्ट्राला

पुढे न्यायचे असेल स्त्रीयांना बंधनमुक्त केले पाहिजे, त्यांना शिक्षण दिले पाहिजे. स्त्रीयांकडे नेतृत्व दिल्यास विश्वशांती व अहिंसक समाज निर्मिती शक्य होईल.[२] गांधीजीच्या विचारानुसार आज समाजव्यवस्थेत सर्वांगीण क्षेत्रात स्त्रिया नेतृत्व करत आहेत. राष्ट्राच्या विकासात स्त्रियांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

### स्त्रीमुक्ती—स्त्रीशक्ती

गांधीजीच्या मते स्त्री आणि पुरूष मुलता समान आहेत. त्यामुळे स्त्रीमुक्ती म्हणजे पुरूषांपासून स्त्रीला वेगळे न करता स्त्रीला सबल करणे म्हणजेच गांधीजीना स्त्रीमुक्ती पेक्षा स्त्रीशक्तीचा नारा त्यांना अभिप्रेत होता. गांधीजी म्हणतात, स्त्री ही पुरूषापेक्षा कमी नाही, शरीर सामर्थ्याच्या बाबतीत ती नसेल बरोबरीची पण स्त्रीयांची नैतिक व बौध्दिक शक्ती पुरूषांच्या बरोबरीची आहे. किंबहुना काही बाबतीत स्त्री पुरूषांपेक्षा काकणभर सरस आहे. ज्या देशात स्त्रियांचा सन्मान केला जात नाही. त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येणार नाही. गांधीजी म्हणतात, पुरूषांप्रमाणेच स्त्रीयांनाही स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. त्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही.[३]

### स्त्रीशिक्षण—

तत्कालीन परिस्थितीत स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता तेव्हा गांधीजीच्या दृष्टीकोनातून ज्याला शिक्षण नाही तो मनुष्य पशूहून फार वेगळा नाही. त्यामुळे स्त्री पुरुष दोघांनाही शिक्षणाची आवश्यकता आहे. स्त्रीयांना आपले नैसर्गिक हक्क बजावून ते कसे वापरावेत यासाठी त्यांनी शिक्षण घेणे आवश्यक आहे.[४]

२० फेब्रुवारी १९१८ रोजी बॉबे भगिनी समाजाने आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी बोलताना गांधीजी म्हणतात, पुरूषांना जसा स्वातंत्र्याचा व शिक्षणाचा हक्क आहे तोच हक्क स्त्रीयांनाही हवा कारण स्त्रीयांना सबल करण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांना शिक्षण देणे.[५] कारण एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शिकल्यासारखे आहे. व्यक्तीला चारित्र्यसंपन्न व सुसंस्कृत बनविण्याचा एक मार्ग म्हणजे शिक्षण व शिक्षणाने माणसाला आपल्या हक्क व अधिकाराची जाणीव होते. सुखी व स्वयंपूर्ण समाजनिर्मितीसाठी व्यक्तीला शिक्षणाची आवश्यकता आहे. त्यामुळे गांधीजींनी स्त्रीशिक्षणाचा आग्रह धरला व आपल्या रचनात्मक कार्यक्रमात शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले. अज्ञाणीजनतेला सुशिक्षीत करण्यासाठी प्रौढ शिक्षणाबरोबर स्त्रीशिक्षणाला चालना दिली.

### विवाहपद्धती—हुंडापद्धती—

गांधीजीच्या मते विवाह हा एक संस्कार आहे. व तो वंश सातत्यासाठी करावयाचा असतो. त्यामुळे पत्नी पतीची दासी नव्हे किंवा संपत्ती नव्हे तर ते दोघे एकमेंकांचे

जीवनसाथी आहेत. दोघांचाही दर्जा समान आहे. तत्कालीन प्रसंगी विवाहात घेतल्या जाणाऱ्या हुंडा पद्धतीला ही गांधीजीनी विरोध केला आहे. ते म्हणतात, जे युवक हुंडा घेतात ते स्त्रीचा तर अनादर करतातच त्याचबरोबर आपल्या देशाला ही बदनाम करतात व असे हुंडयाचे पैसे घेऊन एकप्रकारे काळे हात केलेल्या युवकांना समाजबहिष्कृत करण्याचा सल्ला गांधीजी देतात.

तत्कालीन समाजात कुटुंबात मुलाचा जन्म झाला की आनंदोत्सव करत व मुलीचा जन्म म्हणजे संकट मानले जाई. या भेदभावाला गांधीजी विरोध करतात. त्यामुळे लग्नात होत असलेला प्रचंड खर्च, भोजनावळी या गोष्टी धनिकांनी थांबवून निर्धनांपुढे आदर्श ठेवावा. यामुळे गांधीजीच्या आश्रमात अगदी साध्या पद्धतीने विवाह पार पाडले जात. केवळ प्रार्थना म्हणून व गांधीजीचे आशीर्वाद घेऊन विवाह संपन्न होत. व नवविवाहित जोडप्यांना 'गीता' भेट दिली जाई.[६] हीच साध्या पद्धतीने लग्न करण्याची पद्धत पुढे 'गांधी लग्न' म्हणून प्रचलित झाली. समाजातील हुंडया सारख्या अनिष्ठ प्रथा दूर करण्यासाठी गांधीजींनी कृतीतून आदर्श घालून दिला.

**बालविवाह—**

समाजाला अत्यंत हानीकारक असणाऱ्या बालविवाहाच्या प्रथेला गांधींजीनी विरोध केला. हसण्याखेळयाच्या निरागस वयात आईवडील मुलींची लहानपणी लग्ने करून एकप्रकारे पाप करतात. विवाहानंतर पती त्यांच्यावर मातृत्व लादतात. बालविवाह हा स्त्रीयांसाठी मानसिक व शारीरिदृष्टया हानीकारक आहे व एकदा त्या विवाहकरून पतीच्या घरी गेल्या की आईवडील त्यांना शिक्षणासाठी परत आपल्या घरी आणू शकत नाहीत. तेव्हा पतीने तरी आपल्या पत्नीला शिक्षण दयावे जेणेकरून ती आपल्या जन्म दिलेल्या मुलांना तरी भविष्यात शिक्षीत करू शकेल. बालविवाह झालेल्या स्त्रीयांसाठी गांधीजीनी शिक्षण हा एक उपाय सुचवलेला आहे.[७]

**विधवा पुनर्विवाह—**

बालविवाहाची, विजोड विवाहाची प्रथा प्रचलित असल्याने तत्कालीन समाजात बालविधवांची संख्याही खुप होती. अशा विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. पुरूषांना मात्र पुनर्विवाहाचा अधिकार होता. बालविधवांना मात्र हालअपेष्ठेत जीवन जागावे लागे. त्यातूनच सामाजिक, नैतिक व आर्थिक दृष्टीने काही समस्या निर्माण होत होत्या. त्यामुळे गांधीजी म्हणतात, ' सर्वव्यापक उदात्त अशा आपल्या संस्कृतीत स्त्रीयांना दुय्यम व कनिष्ठ स्थान दयावे हे त्यांना मान्य नाही. एकदा तुम्ही स्त्रीयांना जर समान दर्जा मान्य केला तर पुरूषांप्रमाणे तिलाही पुनर्विवाहाचा अधिकार हवा. स्वच्छेने वैधव्यात जीवन जगणे

ठीक आहे. पण लोकनिंदेच्या भीतीने जबरदस्तीने स्त्रीला वैधव्यात जीवन जगावे लागले हे पाप आहे.[८] त्यामुळे पुनर्विवाहाचे गांधीजीनी समर्थन कलेले दिसते.

पुढे गांधीजी म्हणतात पंधरा वर्षाच्या आत वय असलेल्या विधवा या कुमारीकाच आहेत त्यामुळे त्यांचे लग्न आईवडिलांनी लावून दयावे असा सल्ला ही गांधीजी देतात. त्याही पुढे जाऊन गांधीजी म्हणतात, बालपणी विवाह झालेल्या पती पत्नीनां वयात आल्या नंतर एकत्र रहायचे नसेल तर त्यांना एकमेंकांपासून दूर राहण्याचा सल्ला गांधीजी देतात.[९]

थोडक्यात गांधीजीच्या दृष्टीतून ज्या वयात विवाहाचा अर्थ ही कळत नाही त्या वयात एखादी बालविधवा होते तेव्हा तिला वैधव्याचा अर्थ ही समजत नाही अशा स्त्रीने वैधव्याचा धर्म कसा पाळावा. आईवडिलांच्या दृष्टीने ती विधवाच असल्याने तिच्या लग्नाचा प्रश्नच नसतो पण अशी एखादी बालविधवा वयात आल्यानंतर जर तिला तारूण्य सुलभ भावना निर्माण होऊन विवाह करावयाचा असेल तर तिला त्या बाबत स्वातंत्र्य मिळावे असे गांधाजी म्हणतात किंबहुना तिच्या माता पित्यांनी तिच्या इच्छेनुसार तिला वर मिळवून देण्यास प्रयत्न करावेत पुढे जाऊन गांधीजी म्हणतात, वैवाहिक जीवनाचा अनुभव घेतलेली एखादी स्त्री कालांतराने विधवा झाल्यास ती जर वैधव्यात राहणे पसंत करत असेल तर तिला बाहेरची कोणतीही शक्ती विवाहाच्या मोहात पाडणार नाही. याही बाबतीत त्या स्त्रीचे स्वातंत्र्य अबाधित राहील यावरून गांधीजींचा स्त्रीयांबाबतीत मानवतावादी दृष्टीकोन दिसून येतो. विधवा पुनर्विवाहाबाबत गांधीजींनी स्त्रीला पूर्ण स्वातंत्र्य दिलेले दिसते.[१०]

**घटस्फोट–**

वैवाहिक जीवनात पती आपल्या आध्यात्मिक उन्नतीच्या आड येत असेल किंवा त्याच्यामुळे आपल्या प्रगतीत अडथळा येत असेल तर स्त्रीयांनी जरूर फारकत घ्यावी. व आपले स्वतंत्र जीवन व्यतीत करावे. या विचाराला गांधीनी पाठिंबा दिलेला दिसतो मात्र स्त्रीयांनी सदाचरण व चारित्र्य या गुणांची सदैव जोपासना करावी असाही सल्ला गांधीजी देतात.[११]

**पडदा पद्धती/बुरखा पद्धती–**

तत्कालीन परिस्थितीत प्रचलित असणाऱ्या पडदा पद्धतीला व बुरखा पद्धतीला गांधीजीनी विरोध केला. स्त्रीवर होणाऱ्या प्रत्येक अन्यायी गोष्टीचे निर्मुलन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. ते म्हणतात, चार भिंतीच्या आत स्त्रीला बंद करून तिला कोणतेच न्याय मिळणार नाही. चारित्र्य किंवा पावित्र्य हे बुरख्यात राहिल्याने निर्माण होत नाही किंवा बुरखा काढल्याने नष्ट होत नाही तर ते अंतरंगातूनच निर्माण व्हावे लागते म्हणून स्त्रीयांवर अन्याय करणारी ही बुरखा पद्धत बंद व्हावी ज्याप्रमाणे स्त्रीया आपल्या पती वर विश्वास ठेवतात त्याप्रमाणे पुरूषांनीही आपल्या पत्नीवर विश्वास ठेवावयास हवा. त्याचबरोबर

स्त्रीयांनी सदगुण, चारित्र्य, सदाचरण सामर्थ्य इ. गुणांची वाढ करावी व ते जोपासावेत.[१२] त्यांचा मते हिंदू स्त्री ही सहनशीलतेची मुर्तीच आहे.[१३] आपल्या संयमशील वृत्तीने स्त्रियांनी सामाजिक नीतीमत्ता जोपासावी. सीता, सावित्री, द्रौपदी, दमयंती या प्राचीन आदर्शशील स्त्रियांची उदाहरणे देऊन गांधीजी म्हणतात समस्त स्त्रियांनी सद्यस्थितीत इतर स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करावेत.[१४] गांधीजीच्या प्रयत्नामुळे उत्तरभारतातील काही स्त्रिया पडदयाबाहेर आल्या.

**राजकारणातील स्त्रीयांचा सहभाग–**

स्वातंत्र्याच्या आंदोलनात समाजकारणा बरोबरच राजकारणात देखील गांधीजींनी स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान दिले. ते म्हणतात, स्त्रीया देखील या देशाच्या नागरिक असल्याने स्वातंत्र्य आंदोलनात पुरूषांएवढाच त्यांचाही तेवढाच सहभाग असला पाहिजे.[१५] गांधीजीच्या मते स्वराज्याच्या कामी स्त्रीयांनी पूर्ण योगदान दयावयास हवे. स्वातंत्र्याचे जतन करून ते परत मिळविणे याचे महत्त्व स्त्रीया जोपर्यंत जाणत नाहीत तोपर्यंत राष्ट्राचे रक्षण अशक्य आहे. स्त्रीयांनी आपल्या कुटुंबात व आपल्या मुलांवर देखील स्वातंत्र्य, दृढता व निर्भयता हे गुण बाणवावेत.[१६]

गांधीजीच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन स्वातंत्र्याच्या अहिंसक राजकीय आंदोलनात हजारो स्त्रीया सहभागी होऊन त्यांनी दारूबंदी, खादीप्रसार, स्वदेशी चळवळ, परकीय मालावर बहिष्कार, अस्पृश्यता निवारण इ. कार्यात गोरगरीब शेतकरी, कामकरी वर्गातील आयाबहिणी, थोऱ्यामोठयांच्या लेकीसुना इ. सर्वच जणी सत्याग्रहाच्या चळवळीत निर्भयपणे सहभागी झाल्या. सरोजिनी नायडू, कमला नेहरू, उषा मेहता, विजयालक्ष्मी पंडित, अरूणा असफअली, अंवतिकाबाई गोखले, प्रभावती, अनुसया बेन, मीरा बेन राजकुमारी अमृतकौर, इ. स्त्रीयांनी राजकीय आंदोलनात समाजाचे नेतृत्व स्वीकारले. याचे श्रेय महात्मा गांधीना दयावे लागते. यातील अनेक जणींना लाठीमार सोसावा लागला, तुरूंगवास झाला तरीही आपल्या कुटूंबाची पर्वा न करता स्वातंत्र्याच्या आंदोलनात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

गांधीजींनी स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून समर्थन केले ते म्हणतात, ज्या दिवसापासून स्त्रिया राजकीय चर्चा करायला सुरवात करतील तो दिवसच त्यांच्यासाठी मतदानाच्या अधिकारासाठी प्रारंभ ठरेल.[१७] हा गांधीजीचा विचार सार्थ ठरला.

महात्मा गांधीनी स्त्रीयांना सन्मानाची वागणूक देऊन आपल्या विचारांना कृतीची जोड दिली. त्यांच्या जीवनावर आई पुतळाबाईंची प्रामाणिक वृत्ती, धार्मिकता, व निर्भयपणा या गुणांचा प्रभाव होता. ते म्हणतात, माझ्या मध्ये जी काही थोडी पवित्रता असेल ती मातेकडूनच माझ्यात आली आहे व पत्नी कस्तुरबा कडून मी सत्याग्रहाचा मार्ग शिकलो कारण ती आपल्या दृढनिश्चयावर नेहमीच ठाम असते. आईवडिलांच्या विना मी चाळीस

वर्ष राहिलो त्यातील तीस वर्ष कस्तुरबा ने माझ्या आईची भूमिका बजावली. स्वातंत्र्याच्या आंदोलनात कस्तुरबांनी ही योगदान दिले. गांधीजींनी घरातील स्त्रीयांचाही सन्मान केलेला होता.[१८]

**समारोप—**

तत्कालीन प्रतिगामी समाजव्यवस्थेमध्ये स्त्री सबलीकरणाबाबत पुरोगामी विचार मांडून स्त्रीयांना सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबतीत पुरूषांच्या बरोबरीचे स्थान व दर्जा देऊन स्वातंत्र्य समता प्रस्थापित करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महात्मा गांधीनी केले त्यांच्या कार्याचा परिपाक म्हणून हजारो स्त्रीयांनी समाजाच्या सर्वांगीण क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द केले. स्त्रीया निर्भयपणे पुढे येऊ लागल्या. अनेक क्षेत्रात त्या आत्मविश्वासाने वावरू लागल्या. राष्ट्रउध्दाराच्या कार्यात अनेकींनी आपले योगदान दिले. प्रगतीची शिखरे त्यांनी गाठली. कर्तृत्वाच्या कक्षा विस्तारल्या. भारतात पंतप्रधान पदापासून परदेशातील राजदूत पदापर्यंत अत्यंत महत्वाची, जबाबदारीची पदे सांभाळून पुरूषांच्या बरोबरीने काम करू लागल्या गांधीजीनी स्त्रीयांच्या कार्याबाबत दाखवलेला विश्वास व विचार सार्थ ठरला. सामाजिक बंधनात अडकलेली स्त्री खऱ्या अर्थाने गांधी युगात मुक्त होऊन सबल झाली. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ**


१) डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास
डॉ. वैद्य सुमन, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, आठवी आवृत्ती २०१२ पृ.३४७

२) दीपक कुमार, आधुनिक भारत का संपूर्ण इतिहास, राज पब्लिशिंग हाउस जयपूर २०१० पृ. २२९

३) उपरोक्त, पृ. २२८

४) नलिनी पंडित, गांधी, ग्रंथाली प्रकाशन, गोखले रोड, दादर—मुंबई, तिसरी आवृत्ती— २७ जानेवारी २००६ पृ. २२७

५) Garg L. K. (Ed), Historic Speeches Of Mahatma Gandhi Axis Publicatios, New Delhi 2010 , P. 81

६) दीपक कुमार, आधुनिक भारत का संपूर्ण इतिहास पृ. २३१, २३२

७) Garg L. K. (Ed)Historic Speeches Of Mahatma Gandhi P. 81

८) बोरालकर कृ. दि., भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स नागपूर, दुसरी आवृती १९८७ पृ.१३०

९) नलिनी पंडित, गांधी पृ. २२६

१०) शिखरे दा. न. (अनुवादक), महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय खंड ३०,
नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद गुजरात नोव्हे. १९७६ पृ.३१,३२

११) दीपक कुमार, पृ. २३१

१२) उपरोक्त, पृ. २३१

१३) गांधी मो.क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, पटवर्धन सीताराम (अनु)
नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद नववी आवृती फेब्रु. २००३ पृ.२३

१४) दीपक कुमार, पृ. २३१

१५) नलिनी पंडित, गांधी पृ. २२७

१६) संचालक प्रसिध्दी विभाग, महात्मा गांधी यांचे संकलित वाङ्मय, महाराष्ट्र सरकार
मुंबई, नवजीवन ट्रस्ट अहमदाबाद गुजरात नोव्हे.१९६५ पृ.१७८, १७९

१७) दीपक कुमार, पृ. २३४, २३५